21-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/20/2025 11:49 PM Page 1



# 'मल्लिकार्जुन'च्या तरंगोत्सव, शिशारांधणी, शिमग्याच्या जत्रोत्सवास लोटली गर्दी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २०** :श्रीस्थळ, काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्या षष्टीच्या जत्रौत्सवास आज दि.२० रोजी प्रचंड गर्दी जमली. एवढ्या मोठ्या संख्येने लोक असूनही कोणतीही अनुचित घटना न घडता मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात हा उत्सव आज रोजी, मध्य रात्री संपूर्ण विधी संपल्यानंतर दि.१८ पासून सुरू असलेल्या जत्रोत्सवाची सांगता होईल.





मंगळवार १८ रोजी श्रीस्थळ येथील तळया घेउन अवतारपुरुषाचे तिनही मेळ आपआपल्या घरवईवर निघतात.ह्या दिवशी देवाला दिवज सेवा अर्पण करणाऱ्या सुहासीनी दिवजांचा उपवास पाळला.

बुधवार १९ रोजी, पहाटे तिन्ही घरवईवर अवतार व कौलप्रसाद होईल. श्री मल्लीकार्जुन मंदिर परीसरात सकाळी वेळीप, त्यानंतर किंदळेकर देसाई व नगर्सेकर देसाई कुटुंबियांच्या दिवजांच्या भोवरी होतील. रात्री ८.३० वाजता श्रींचा रौप्य शीबिकोत्सव, गुलालोत्सव, पाजीवरील सुवारी व नंतर खोलकर भावपूत बंधूतर्फे सुवारी वादन सादर केले.

गुरुवार २० रोजी सकाळी श्रीस्थळ येथे नविन लग्न झालेल्या पुरुषासाठी शेली टोचून घेण्याचा विधी व शेलची भोंवर, तुलाभार व दुपारी दोन वाजता मंदिराच्या राजांगणात बहुसंख्य जनसमुदायाच्या उपस्थितीत अवतारपुरुषाचा अवसर व प्रसिद्ध शिर्शारांधणी उत्सव संपन्न झाला.

देवस्थानच्या राजांगणात आज रोजी यंदाचा शेवटचा अवतार होय. यावेळी शीर्षारान्नीच्या विधी चित्तथरारक ठरतात. अवतारावेळी अवतार पुरुषाची ही तरंगे राजांगणात कसल्याही आधारावीना सरळ ऊभी रहातात. ३ गाड्यांच्या दंडाला गरे टोचून त्यांना खाली् झोपवून त्यांच्या डोक्याची चूल करून शीशसईच्या झाडाच्या लाकडाचा विस्तव करून डोक्यावर ठेवलेल्या मातीच्या मडक्यात नैवेद्य शिवला जातो. त्यानंतर एका अवसर आलेल्या भगताला खरवत देणे (अर्थात तलवारीने भगताच्या डोक्याचे रक्त काढणे) त्यानंतर मडक्यात शिजवलेल्या भातात रक्त मिसळून तभात राजांगणात सर्वत्र शिंपडतात. हा क्षण अत्यंत रोमांचकारी असतो. हा विधी उपस्थित सर्वजण श्वास रोखून यांची देही पाहतात. यावेळी भक्त सपासप तलवारी स्वतः:ध्या अंगावर चालवतात अवतार झाल्यानंतर गडे भाविकांना कौल देतात.तो मध्यरात्री पर्यंत चालतो. त्यानंतर तरंगे देवस्थानच्या चौक्यांवर येऊन कुटुंब प्रमुखाना शेवटचे कौल देतात. विसर्जन झाल्यानंतर पेन्नोटी येथे केळी प्रसाद वितरणाचे हा विधी संपतो व या जत्रौत्सवाची सांगता होते. विविध भागातून भक्तगतणांनी उपस्थिती लावली होती. सभापती रमेश तवडकर, नगराध्यक्षा सारा देसाई, उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर, उपस्थित होते.

**NOTICE**

My Husband **Late Francisco Xavier Fernandes** was owning **Maruti Baleno Zeta Car** bearing **Reg. No. GA-06-F-1633.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Sd/-
Date: 20.03.2025 **Mira Rosaria Dias**
**H.No. 409, Behind Desterro Church, Vasco Da Gama, South Goa 403802**

Sandeep Ads

**CHANGE IN NAME**

I **BERNARDA HENRIQUETA DINIZ** R/o, H No-96, Mestri wado Molcornem Sanguem Goa, I would like to change my name from **BERNARDA HENRIQUETA GONSALVES** TO **BERNARDA HENRIQUETA DINIZ,** Hereafter all my documents and dealing will be known by the name **BERNARDA HENRIQUETA DINIZ.**

**BEFORE THE DY. COLLECTOR & S.D.O.**
**MAPUSA SUB DIVISION, MAPUSA, GOA**

Case No. LRC / MUT / APL / BAR-I / 01 / 2025

Mr. Rui Ubaldino Da Gama, Off: Sweethome Bldg, 1st Floor, Mapusa, Goa .......Appellant

V/s

1. Mr. Bryan Nazareth Reis Magos Baracho, R/o Mapusa, Bardez, Goa .... Respondent

**PUBLIC NOTICE**

To, The Respondent,

WHEREAS, the above named appellant has filed an appeal against the Order dated 11/10/2024 passed by the Joint Mamlatdar III of Bardez / Certifying Office in mutation Case No. - / Mapusa in respect of property bearing Chalta No. 11 of P.T. Sheet No. 135, Mapusa City.

AND WHEREAS, the notice issued to the respondent, which remained to be un-served, the notices issued to the respondent is returned back with endorsement "Addressee left without instruction.

AND WHEREAS, vide application dated 17/02/2025, the Appellant has submitted that he is not aware about proper addresses of the respondent therefore prayed for substitute service of notice.

AND WHEREAS, considering the above fact, I am satisfied that this is a fit case to order for such publication of notice in terms of Order V Rule 20(1A) of C.P.C. 1908.

Therefore, notice is hereby given to the above respondent / his legal heirs to appear before this Court on 21/04/2025 at 10.30 a.m. either in person or through authorized agent to give their say in the matter, failing which the application will be determined and decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this 17th day of March 2025.

Sd/- **Varsha S. Parab**
Dy. Collector & SDO I,
Mapusa Sub Division, Mapusa, Goa
Seal

**VILLAGE PANCHAYAT USGAO - GANJEM PONDA – GOA**

Ref. No. VPUG/Quotation/2024-25/3713
Dated:- 20/03/2025

**QUOTATION NOTICE**

The sarpanch of Village Panchayat Usgao Ganjem invites sealed Quotation from Eligible supplier from the State of Goa in order to Supply the Office stationary and printing stationary for the year 2025-26 and sealed quotation should reach in this office on or before **28/03/2025 by 1.00 p.m** and the same will be opened on **01/04/2025 at 11.30 a.m**

The interested supplier should quote the amount for Office stationary and printing stationary separately in the sealed envelope and the amount should be inclusive of taxes & delivery charges.

And whereas the list of the office stationary and printing stationary will be available in the panchayat office during the office hours from **21/03/2025 to 28/03/2025 by 12.00 noon.**

**Note:-** The Panchayat will reserve the right to accept or reject all quotation without assigning any reason thereof.

Seal
**Sd/- Sarpanch,**
**Village Panchayat Usgao-Ganjem**

**VILLAGE PANCHAYAT USGAO – GANJEM, PONDA, GOA**

Ref. No. VPUG/Quotation/2024-25/ 3714 Dated: - 20/03/2025

**QUOTATION NOTICE**

The sarpanch of Village Panchayat Usgao Ganjem invites sealed Quotation from Eligible supplier from the State of Goa in order to Supply of Full HD CCTV Camera system to the office of V.P Usgao Ganjem and sealed quotation should reach in this office on or before **28/03/2025 by 1.00 p.m** and the same will be opened on **01/04/2025 at 11.30 a.m**

| Sr. No. | Particular of item | Cost per item |
|---|---|---|
| 1 | Supply of Full HD CCTV system to the office of V.P Usgao Ganjem, Ponda Goa. | |

And whereas the interested supplier should quote amount by approach to this office during office hours to verify the site where the said CCTV camera to be installed before the last date of quote and submit the quote as per requirement of the Panchayat office as on above mentioned time and date and only standardized brands will be accepted by this office.

**Note:-** The Panchayat will reserve the right to accept or reject all quotation without assigning any reason thereof.

Seal **Sd/-**
**Sarpanch, V.P. Usgao-Ganjem**

**Village Panchayat Se Old Goa, Tiswadi-Goa**

VP/SOG/TIS/2024-2025/ 2087 **TENDER NOTICE** Date: 20.03.2025

The Sarpanch on behalf of the V.P. Se Old Goa, Tiswadi-Goa, invites sealed percentage rate tender from eligible Contractors of state PWD Goa, registered in appropriate class and categories for the following work.

| Sr. No. | Name of work & location | Estimated cost put to tender | Earnest money deposit | Cost of tender Document | Class and category of Contractor | Period of completion (in days) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Reconstruction and Repair of existing road from Dessai house to Lahoo Halarankar in ward No.VI at Dotorbhat colony of V.P. Se Old Goa | Rs.4,83,763.20 | Rs.9675 /- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 2 | Construction of drainage of about 1 to 1.5mtr. from Gomanteshwar Arch to Ella Farm old gate near Amey Uscaikar house I ward No.05, V.P. Se Old Goa. | Rs.484215.05 | Rs.9684/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 3 | Construction of drainage with R.C.C. slabs from Casa Amora phase III till main road (Phase 2) in ward No.03, within the jurisdiction of Se Old Goa Panchayat. | Rs.483749.68 | Rs.9674/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 4 | Repair and Reconstruction of existing drainage from Vaz house to junction with R.C.C. Slabs in ward No.04 in the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.307429.07 | Rs.6148/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 5 | Repairs of road from Casa Amora phase III till main road (phase 2) in ward No.03, within the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.482572.80 | Rs.9651/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 6 | Repair and Reconstruction of existing drainage from Sudarshan Garage to Anthony house through V.P. fund in ward No. IX or V.P. Se Old Goa. | Rs.482803.14 | Rs.9656/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 7 | Re-construction of existing road from Mahendra Parvatkar house to Ramdas Garage in ward No.7, in the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.481424.00 | Rs.9628/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 8 | Reconstruction of existing drainage with RCC slabs from Railway gate, Dhauji to MRF shed in ward No.09, in the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.479264.00 | Rs.9585/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 9 | Reconstruction of existing drainage with RCC slabs from Swarna hall to Ghumti in ward No.07 in the jurisdiction of V.P. Se Old Goa, Tiswadi Goa. | Rs.483102.10 | Rs.9662/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |
| 10 | Reconstruction of drainage from Primary school Sao Pedro to Vitthal Mandir in ward No.1 V.P. Se Old Goa | Rs.483567.49 | Rs.9671/- | 2000.00 | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD) | 60 days (excluding monsoons) |

**Terms and conditions:** **1.** Last date of receiving application is on **29.03.2025 up to 12.00 noon** along with cost of tender form (non-refundable). **2.** Date of issue of blank tender form is on **01.04.2025 up to 12.00 noon. 3.** Date of receipt of sealed tender is on **03.04.2025 up to 11.30 a.m.** and will be opened on same day at **12.00 noon. 4.** Application for issue of tender form shall be accompanied with **a)** Attested copy of valid registration certificate of the contractor in the concerned class and category of work. **b)** Attested copy of PAN card. **c)** Attested copy of valid GST registration certificate and acknowledgement of up-to-date return filed with ARN. (Application Reference Number generated on GST common portal) as per GST law. **d)** Declaration of the works in hand shall be submitted with detailed list indicating the present status, on Rs.100/- stamp paper (however tender form will not be issued to the person who has works in hand more than four times the tendering limit). **e)** Attested copy of valid Income Tax clearance Certificate. **5.** EMD shall be in the form of Demand Draft/Deposit Call Receipt (DCR)/Pay Order from Nationalized or Scheduled bank drawn in favor of Village Panchayat Se Old Goa payable at Se Old Goa sealed in separate envelop. **6.** Contractor shall submit separate application for each work. Incomplete and third-party application shall not be entertained by this Panchayat and no tender form shall be issued. **7.** Unsealed and conditional tenders will be rejected outright. **8.** The contractor shall quote the tender excluding GST as applicable shall be paid separately on total value of work executed. **9.** For the tenders/Items of tender in case of being quoted abnormally below i.e. 20.00% below the estimated cost, than the contractor shall furnish on demand an additional performance security in the form of Bank guarantee from National/Scheduled Bank for that amount which is worked out as difference between quoted amount and reasonable Amount reduced by 20.00%. **10.** Right to accept or reject any or all the tenders without assigning any reasons is reserved with the Village Panchayat. The Panchayat reserves the right to reject any of tenders and accept any one without assigning any reason thereof.

Seal Sd/- ( Medha M. Parvatkar ) Sarpanch, V. P. Se Old Goa, Tiswadi-Goa

# हरमल नानोस्करवाड्यावर पुन्हा बिबट्याचे दर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २०** : येथील नानोस्करवाड्यावर साधारण दोन महिन्यानंतर पुन्हा बिबट्याचे दर्शन झाल्याने नानोस्कर कुटुंबीय भीतीच्या छायेत वावरत असल्याने परिसरात कमालीची अस्वस्थता पसरली आहे.

दरम्यान स्थानिक ग्रामस्थ तसेच देशी विदेशी पर्यटक टेम्पल रोडचा वापर करीत असतात. त्या मार्गातील ह्या घराच्या अंगणात, न जाणो बिबट्या कधीही रस्त्यावर टपकला तर जीवितहानी होऊ शकते, अशी भीती पसरली आहे.

काल २० रोजी पहाटे २ च्या सुमारास बिबट्या सीसीटिव्हीत कैद झाला. सध्या बिबट्याची बॉडी बछड्याची नसून पूर्ण वाढ झाली आहे.नानो स्कर यांच्या अंगणात त्याचा वावर म्हणजे अंगावर शहारे आणणारा होता. सुदैवाने नानोस्कर यांनी पाळीव कुत्र्याला पिंजऱ्यात ठेवले होते व बिबट्याने झडप घालण्याचा प्रयत्न केला.पिंजऱ्यात असलेल्या कुत्र्याने धाव घेतली, त्यासरशी बिबट्या मागे हटला व पाहत राहिला.कुत्रा जेरबंद असल्याचे दिसून आल्याने बिबट्या आल्यापावली माघारी फिरला. मात्र त्याला चटक लागल्याने पुन्हा बिबट्या नित्य येणार असल्याचे चित्र आहे.



हरमल : सागर नानोस्कर यांच्या निवासस्थानी प्रांगणात बिबट्याचा वावर.

दरम्यान, जानेवारी महिन्यात बिबट्याने कुत्र्यांचा फडशा पाडल्यानंतर सागर नानोस्कर यांनी वन खात्या लेखी तक्रार केली होती. त्यावेळी सात दिवस पिंजरा लावून खात्याने हालचाल केली होती.मात्र नवव्या दिवशी पुन्हा बिबट्या अवतरल्याने नाराजी होती.एकदा बिबट्या जेरबंद झाला की परिसरात भीतीची छाया दूर झाली असती. मात्र काल पुन्हा दर्शन झाल्याने जेरबंद करण्याशिवाय पर्याय नसल्याचे दिसून येते.

पेडणे वनखात्याने याची दखल घेऊन बिबट्या जेरबंद होईपर्यत सापळा लावावा. अवघे पिंजरे असल्याचे कारण सांगून वन खात्याने सदर पिंजरा अन्यत्र हलविला होता.त्यामुळे हरमलमधील बिबट्या निर्धास्त राजा सारखा वावरत राहील व परिसरात दहशत निर्माण करील,असे नागरिक बाबी नाईक यांनी व्यक्त केले.

# एकपात्री अभिनय स्पर्धेत मिष्टी सावंत प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १९** : अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज पेडणे तालुका समिती आयोजित शिवजयंती उत्सव २०२५ एकपात्री अभिनय स्पर्धेत प्रथम क्रमांक मांद्रे येथील मिष्टी राजेश सावंत यांनी पटकावला.

सविस्तर निकाल खालील प्रमाणे – प्रथम मिष्टी सावंत, द्वितीय श्रीयान

**▸अखिल गोमंतक मराठा समाज पेडणेतर्फे शिवजयंती उत्सव**

काळोजी, श्रीयांश सुभाजी, तृतीय पलक गडेकर, उत्तेजनार्थ साईराज सावंत, कार्तिक हरमलकर.

अखिल गोमंत क्षत्रिय मराठा समाजाने आयोजित केलेल्या पेडणे तालुका एकपात्री अभिनय स्पर्धेमध्ये विजेत्यांना बक्षीस देण्यासाठी डीचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, माजी केंद्रीय मंत्री ॲड. डवोकेट रमाकांत खलप, मोरजी जिल्हा पंचायत सदस्य सतीश शेटगावकर,अखिल गोमंत क्षत्रिय मराठा समाज पेडणे तालुका समितीचे अध्यक्ष सचिव एडवोकेट अमित सावंत, शंकर महाले, पंच लौकिक शेट्ये आधी उपस्थित होते.



यावेळी आमदार डॉय चंद्रकांत शेट्ये यांनी की, अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज पेडणे तालुक्याने तालुक्यातील समाज बांधवांसाठी केलेले कार्य उल्लेखनीय असून सर्व समाजाला संघटित करून ते कार्य करत आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून कलाकारांचा सत्कार स्त्री कलाकारांच्या सत्कार बरोबरच सर्व समाज सर्व धर्मातील कलाकारांना एका व्यासपीठावर आणून एकपात्री अभिनय नाट्य स्पर्धेबरोबरच हिंदवी स्वराज्य या संकल्पनेवरून नाटकाची स्पर्धा आयोजित करून एक चांगला पायंडा घातला आणि एका कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचं काम या समितीने केले. असेच कार्य याही पुढे चालूच ठेवावे. असे आवाहन यावेळी आमदार डॉ. शेट्ये यांनी केले.

ॲड. अमित सावंत यांनी अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज पेडणे तालुका समिती मार्फत पेडणे तालुक्यातील कलाकारांना एक व्यासपीठ मिळावं या उद्देशाने हिंदवी स्वराज्य नाट्य स्पर्धेचे आयोजन केले. कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच त्या कलाकारांचा सन्मान व्हावा. या उद्देशाने या स्पर्धेचं आयोजन केले आणि अनेक कलाकारांनी या स्पर्धेत सहभाग दर्शवला. ज्या ज्या गावात नाट्य स्पर्धा झाले. नाटकाचे प्रयोग झाले. त्या ठिकाणी उदंड प्रतिसाद ही मिळाल्याचे ॲड. अमित सावंत यांनी सांगून मांद्रे सावंत वाडा श्री भूमिका मंदिरमध्ये एक पात्री अभिनय स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला असे ते म्हणाले. यावेळी माजी केंद्रीय कायदामंत्री रमाकांत खलप ॲड. शाम शेट्ये, मोरजी जिल्हा पंचायत सदस्य सतीश शेटगावकर आदींनी भाषणे केली. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देण्यात आली.

# साळ येथील शिमगोत्सव उत्साहात; घोडेमोडणी, न्हावनाने समारोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २०** : येथील प्रसिद्ध सात दिवसाचा शिमगोत्सव मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमांनिशी

**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
**At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.**

**ABN Case No.:-ARCS/VPK/CANACONA/2023/ABN/2165**

VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Canacona Branch, Canacona- Goa. **... Disputant**

**V/s**

1. Mrs. Reshmi Lopes:EWS-73, Housing Board Colony Gogal Margao Goa. 2. Mrs.Roshni Julie Lopes : E W S - 73, Housing Board Gogal Margao Goa. 3. Mr.Nagesh Subhash Ircal:H.No.EWS/200, Gogal, Housing Board, Margao Salcete Goa. 4. Mr.John Ruzar Lopis :H.No.EWS-73, Gogal, Housing Board Colony Margao Salcete Goa **...Opponents**

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To,
The Opponent No. 1, 2 & 4

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs. 2810965.70** (Rupees Twenty Eight Lakhs Ten Thousand Nine Hundred Sixty Five and paise Seventy Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks **"Party Left** returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 19.02.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **17.04.2025 at 10.30 a.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 20th day of March 2025.

SEAL
Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti
Ponda- Goa.

Place: Ponda
Date: 20.03.2025



साळ : येथील देवस्थानच्या घोडेमोडणीत सहभागी घोडेस्वार, सदाशिव गाडगीळ, कालिदास राऊत, अशोक परब, विश्वनाथ परब, उमेश राऊत व महाजन.

झाला. होळी दिवशी बोर्डे डिचोली येथील सुनील कमलाकांत पळ आणि कुटुंबीयांकडून श्री भुमिकादेवी चरणी होळी अर्पण केली. होळी आणण्यासाठी साळ गडे, ग्रामस्थ, राऊत व परब महाजन यांच्या साथीने वाजत गाजत बोर्डे मधील घोंडयात या बागाईत क्षेत्रातूनआणली. त्यापूर्वी पुरोहित सदाशिव गाडगीळ याच्याकरवी मधुकर परब, सुनील पळ, हनुमंत घाडी यांच्या हस्ते विधिवत पूजा करून हनुमंत घाडी व साथी तसेच च्यारी कुटुंबियांकडून तोडण्यात आली. दुपारच्या वेळेस व मध्यंतरी अनेक भाविकांनी उपस्थितांना भोजन व इतर पदार्थ स्वखुषीने दिलेत. नंतर रंग उधळीत कार्यक्रम ठिकाणी पोचली ही होळी कोकम झाड, ती ६५ फूट उंच (लांब) होती. तिला मिरवणुकीने श्री महादेव मंदिराच्या प्रांगणात आणली. च्यारी व मित्रमंडळी कडून होळी तासण्यात आली त्यानंतर तळकटकर भाविकांकडून होळीला आंब्याच्या डहाळ्या बांधून सजवण्यात आले.रात्री पावणे दोनच्या सुमारास ही होळी पारंपारिक पद्धतीने पारंपरिक जागेत उभी करण्यात आली. होळी उभी करीत असताना देव देवताने तीन वेळा मशाल पेटवून दर्शन दिले. दुसऱ्या रात्रीपासून तीन रात्री गडे उत्सव साजरा झाला. हा गडे उत्सव श्री महादेवाने खेळ आरंभला व भूमिका देवीने देवीकडे या खेळाची सूत्रे सोपवली तर मांडवेश्वर यांनी सूत्रे आपल्या ताब्यात घेऊन खेळायला सुरुवात केली. रात्री दररोज आठ वाजता श्री सिद्धेश्वर देवस्थान कडून रोंबट सुरू होऊन रोंबटासोबत देव माडवेश्वर होळी पाशी येतो अशी भावना आहे, ते वर्षानुवर्षे नित्यनेमाने चालते. त्यानंतर ग्रामस्थ भाविक यांची पुरोहिताकडून गाऱ्हाण्याला सुरुवात झाली व गडे पडायला सुरुवात झाली की ढोल ताशा, नमन सुरुवात होऊन अखंडपणे गडे संपेपर्यंत चालू राहते. दुसऱ्या रात्री तिघांवर गड्यांचा भार आला . त्यात सतरा वर्षांनी अरुण राऊत, नवव्या वर्षी आनंद साळकर, पाच वर्षांनी संदेश परब यांच्यावर भार आला. गडे लपवणे, गडे देणे हे चालू होते भाविक मशाल बघण्यासाठी गड्या पाठीमागून धावत असतात, काट्याकुट्यांची तमा न बाळगता, किती लांबचा पल्ला पार केला हे ही विसरतात. अशा भावनेने मशाल बघण्यासाठी धावले यावेळी बाबरेश्वर, माडवेश्वर, भूमिका मंदिर, पातोळेकडे, जठार, म्हालकुमी, चिचेवर तसेच शेवटचा गडा घवनाळेश्वर या क्षेत्रात दिला. शेवटच्या रात्री मसणवटीत जाऊन मसणे आणली, ढोलांच्या तालावर लयबद्ध नृत्य केले नि मसणे परत स्मशानभूमीत पोहोचवली नी होळी कडे येऊन गडयाचा अवसार (भार) गेला.

पाचव्या दिवसापासून गड्यांचे रोबंट सुरू झाले. ते खोलपेवाडी, साळ पुनर्वसन , कुमयामळा, कोळगिरे, वरचा वाडा, मधलावाडा, खालचावाडा, नवी कॉलनी आदी येथे फिरून होळी पाशी आल्यानंतर येथील युवक होळीला रंग पासून धुळवटीला सुरुवात केली. सिद्धेश्वर मंदिराकडे होळीवरचा नारळ काढून वाढवला त्यानंतर खालच्यावाडा येथील होळी वरचा नारळ काढून वाढवला तत्पूर्वी येथील श्री महादेव मंदिर, चव्हाटेश्वर, कुलदेवता, भूमिका व शेवटी होळी जवळ घुमट आरती सादर केली त्यानंतर येथील नदीपात्रात आंघोळ केली . संध्याकाळी राऊत , परब व घाडी कुटुंबातील (नागेश प्रमोद राऊत, शाबीत दत्ताराम परब, पद्मानंद प्रकाश घाडी) हे तीन घोडे नेसले. महादेव मंदिराकडून निघालेली घोडेमोडणी अशोक परब व उमेश राऊत, इतरांच्या मार्गदर्शनाखाली गावाच्या सीमेपर्यंत जाऊन एक प्रदक्षिणा पूर्ण करून आल्यानंतर चव्हाटेश्वर मंदिरात न्हावनाचा (तीर्थाचा) कार्यक्रम सुरू झाला तत्पूर्वी महाजन लाडू परब यांच्याकरवी श्री कुलदेवता मंदिरातून तिर्थाचा कलश चव्हाटेश्वर मंदिरात आणला त्यांची विधीवत नामदेव राऊत यांच्या हस्ते पूजा करण्यात आल्यानंतर सदाशिव गाडगीळ अयांच्याहस्ते भाविकांना न्हावान (तीर्थ) वाटपाचा कार्यक्रम सुरू झाला अशा रीतीने सात दिवसाचा शिमगोत्सव झाला. या शिमगोत्सवात सरकारी यंत्रणेवर डिचोली चे आमदार डॉ. चंद्रकांत शेटये हे जातीने लक्ष ठेवून होते. पोलिस खात्याचे पोलिस , वाहतूक पोलीस खाते, विज खाते, पाणीपुरवठा खात्याने ,अग्निशमन दलाच्या जवानांनी तसेच आरोग्य सेवा अंतर्गत डॉक्टर, परिचारिका व इतरांनी योग्य सेवाकार्य दिल्याने या सर्वांचे देवस्थान मंडळ, गडेमंडळ, साळवासियांनी आभार मानले.

पान १ वरून

## विश्वजित राणे यांच्या राजीनाम्यासाठी तीव्र निदर्शने

त्यांनी म्हटले की, कलम १७ (२) मध्ये सुधारणा केल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान झाले आहे. याच नियमाचा वापर करून २५ लाख चौरस मीटर जमिनीचे रूपांतर झाले आहे. शेर्लेकर पुढे म्हणाले, झोन विक्रीला मंजुरी देणाऱ्या कलम ३९ (अ) ला गोवा फाउंडेशनने न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून, मंत्री राणे यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप केला आहे. चर्च स्क्वेअरवर निदर्शने केल्यानंतर कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री निवासस्थानाकडे कूच करत निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी अल्तिन्हो परिसरात निदर्शकांना रोखले. काही वेळानंतर स्वप्नेश शेर्लेकर, डॉ. क्लॉड अल्वारेस आणि अन्य एका व्यक्तीला मुख्यमंत्री निवासस्थानात प्रवेश देण्यात आला. मात्र, त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी भेट नाकारल्याची माहिती देण्यात आली. या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली. शेर्लेकर म्हणाले, मुख्यमंत्री परदेशी अधिकाऱ्यांना भेटायला वेळ काढू शकतात, पण गोवेकर नागरिकांना भेटायला वेळ नाही. हे वर्तन लाजीरवाणे आहे. गोवा फाउंडेशनचे संस्थापक डॉ. क्लॉड अल्वारेस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर मुख्यमंत्री सावंत यांनी मंत्रीमंडळातून विश्वजित राणे यांची हकालपट्टी केली नाही, तर आम्ही हा विषय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे नेऊ आणि न्यायालयात लढाई लढू. राणे यांनी मंत्रीपदावर राहून अनेक नियमबाह्य निर्णय घेतले आहेत. २०२७ मध्ये या सरकारला त्याचे परिणाम भोगावे लागतील. कार्यकर्त्यांनी उद्यापासून ऑनलाईन स्वाक्षरी मोहीम सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. जोपर्यंत विश्वजित राणे यांची हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## बनावट अनुभव प्रमाणपत्रे प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्याची मागणी

पुन्हा याचिका दाखल केल्यानंतर सरकारने सहा महिन्यांत कारवाईचे आश्वासन दिले होते. तत्कालीन फोंडा उपजिल्हाधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती.



लाडफे : सातेरी केळबाय देवीचा कळस फिरवताना या वर्षीचे पलटदारसमवेत विष्णू मळीक, बापू मुळीक व इतर.

# सातेरी केळबाय देवीच्या 'कळस' उत्सवाची सांगता

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २०** : लाडफे – डिचोली येथील श्री सातेरी केळबाय देवींचा वार्षिक कळस मंदिरात येऊन शिमगोत्सवाची सांगता झाली. होळीच्या दिवसा पासून शिमगोत्सवास सुरवात होवून सातव्या दिवशी सकाळी घुमट सुवारी वादनाने धुळवटीला सुरुवात झाली. सर्व देवांवर रंगाची उधळण करुन रंगपंचमी साजरी केली .नंतर संपूर्ण लांडे गावात धुळ घातली गेली . व मंदिरात येऊन देवांना गाऱ्हाणे करुन मांड बसविला गेला.नंतर या वर्षीचे पलटदारांनी देवींचे कळस माथी घेऊन कळसकोंडदेवाच्या ठिकाणाहून तीर्थ आणले व यंदाच्या पलटदाराच्या घरी प्रथम जावून कळसांची पूजा अर्चा केली.त्यानंतर रात्रभर संबंध गावात घरोघरी जाऊन कळसांची पूजा अर्चा केली व दुसऱ्या दिवशी सकाळी सोनारभाट लाडफे येथे घरोघरी पूजा अर्चा घरातील मंडळी कडुन झाल्या नंतर कळस देव मंदिरात येऊन शिमगोत्सवाची सांगता झाली.